MHNG080027462023

पी.डब्ल्यु.डि.व्ही.ए. क्र.४७/२०२३

प्रेरणा व १ वि. सचिन व १

## आदेश (नि.क्र.१६ खाली)

(घोषीत दिनांक २४/०१/२०२५)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३, १८ व १९ अंतर्गत दरमहा रु.२०,०००/– अंतरीम पोटगी, तसेच संरक्षण आदेश व निवासस्थान उपलब्ध करुन स्त्रीधन परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दि.२६.०५.२०१७ रोजी हिंदू रितीरीवाजाप्रमाणे रॉयल लॉन, नाका नं.२ कामठी रोड नागपूर येथे झाला होता. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांच्या घरी संयुक्त कुटुंबात नांदण्यास गेली. गैरअर्जदार क्र.१ हे टायर मोटर्स दुकानामध्ये काम करतात असे सांगून अर्जदार क्र.१ चे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत करण्यात आले होते. गैरअर्जदार क्र.१ यांनी लग्नाच्या काही दिवसानंतर नोकरी सोडली. अर्जदार क्र.१ ने त्याबाबत विचारले असता गैरअर्जदार क्र.१ ने काही उत्तर दिले नाही. त्यामुळे तीने गैरअर्जदार क्र.३ ला त्याबाबत विचारले असता गैरअर्जदार क्र.३ ने सांगितले की त्याला कामावर बरोबर पगार मिळत नाही म्हणून त्याने काम सोडले. त्यावेळी घरातील सर्व खर्च गैरअर्जदार क्र.३ करत होती. गैरअर्जदार क्र.१ ने काम सोडल्यामुळे अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांच्यात वादविवाद व्हायचे. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ला कामाकरिता बोलायची तर गैरअर्जदार क्र.१ तिच्यासोबत भांडण करायचा. काही महिन्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याला वाडी येथे कंस्ट्रंक्शन कंपनीमध्ये काम मिळाले. गैरअर्जदार

क्र.१ काही दिवस कामावर जायचा व त्यानंतर घरी राहायचा. त्यावर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ला कामावर का जात नाही असे म्हणायची त्यावर तो तिच्यासोबत भांडण करायचा तसेच अश्लील शिवीगाळ व मारहाण करायचा.

३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ला गैरअर्जदार क्र.१ कडून एक मुलगी म्हणजेच अर्जदार क्र.२ झाली. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ काही दिवस चांगले राहीले. गैरअर्जदार क्र.१ चार दिवस कामावर जायचे व त्यानंतर घरी राहायचे. अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ला लागणा–या खर्चाबद्दल गैरअर्जदार क्र.१ ला बोलायची, परंतू गैरअर्जदार क्र.१ काही उत्तर देत नव्हते. अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ला दवाखान्याकरिता लागणा–या खर्चाकरिता गैरअर्जदार क्र.१ ला पैसे मागायची त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ हे तिला शिवीगाळ व मारहाण करायचा. त्यामुळे अर्जदार क्र.१ चे आई–वडील हे अर्जदार क्र.२ ला दवाखान्यापासून ते कपडयांपर्यंत लागणारा संपूर्ण खर्च करायचे.

४. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांच्या घरची सर्व कामे करायची तरीही गैरअर्जदार क्र.४ अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांच्यामध्ये भांडण लावायची. गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ ला नोकरासारखी वागणूक द्यायचे. अर्जदार क्र.१ ही घरातील सर्व कामे करुन सुद्धा गैरअर्जदार तिला म्हणायचे की तू काहीच काम करित नाही. सन २०२० मध्ये गैरअर्जदार क्र.३ चे लग्न झाले. गैरअर्जदार क्र.१ कामाला जात नव्हते म्हणून गैरअर्जदार क्र.३ ने गैरअर्जदार क्र.२ ला इ–रिक्शा घेऊन दिला होता व गैरअर्जदार क्र.३ च्या लग्नानंतर घरातील सर्व खर्च गैरअर्जदार क्र.२ करित होते. अर्जदार क्र.१ ला अर्जदार क्र.२ च्या शिक्षण, औषध आणि बाकी लागणा–या खर्चाकरिता गैरअर्जदार क्र.२ ला पैसे मागावे लागत होते. अर्जदार क्र.१ ला पदोपदी गैरअर्जदार क्र.२ अपमानीत करायचे. अर्जदार क्र.१ ला गैरअर्जदार क्र.१ मारहाण करायचे. गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ ची मानसिक, शारिरीक व

आर्थीकरित्या पिळवणूक करायचे. गैरअर्जदार क्र.१ हे गैरअर्जदार क्र.३ व ४ चे ऐकून अर्जदार क्र.१ सोबत भांडण करायचे.

५. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ हिने तिला होणा–या त्रासाबददल तिच्या आई–वडीलांना सांगितल्यावर तिचे आई–वडील आले व ती तिच्या आई–वडीलांसोबत माहेरी गेली. परंतू गैरअर्जदार क्र.१ ने कधीही अर्जदारांना परत आणण्याचा प्रयत्न केला नाही. तरी सुद्धा अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी अर्जदारांना एक महिन्याने सासरी नेऊन दिले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ काही दिवस चांगले राहले व पुन्हा अर्जदार क्र.१ ला मारहाण केली. त्यानंतर अर्जदार क्र.१ ला तिचे वडील पुन्हा आपल्यासोबत घेऊन गेले. दोन महिन्यांनी पुन्हा गैरअर्जदार क्र.१ च्या घरी अर्जदारांना आणून दिले. अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ कडे पाहून व तीच्या भविष्याकरिता सर्व त्रास सहन करित होती. परंतू गैरअर्जदार क्र.१ च्या वागण्यात काही सुधारणा झाली नाही. अर्जदार क्र.२ ने गैरअर्जदार क्र.१ ला कॉटन कॅन्डी घेण्याकरिता रु.१०/– मागीतले असता गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.२ ला खूप मारहाण केली. अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ला वाचविण्याकरिता गेली असता गैरअर्जदार क्र.१ ने तिला पितळीच्या गंजाने डोक्यावर मारहाण केली. त्यानंतर अर्जदार क्र.१ ने तिच्या आई–वडीलांना बोलावून घेतले. अर्जदारांची परिस्थीती बघून अर्जदार क्र.१ चे वडीलांनी अर्जदारांना त्यांच्यासोबत कपिल नगर पोलीस स्टेशनला नेले व तक्रार दिली. त्यानंतर अर्जदार क्र.१ चे वडील त्यांना आपल्यासोबत कामठीला घेऊन आले. काही दिवसांनी अर्जदार क्र.२ ला जात प्रमाणपत्राची आवश्यकता पडली तेव्हा अर्जदार क्र.१ ते घेण्याकरिता गैरअर्जदार क्र.१ च्या घरी गेली त्यावेळी त्याने तिला आत येऊ दिले नाही व हाकलून दिले. गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदारांना आणण्याकरिता आले नाही. गैरअर्जदार क्र.१ हे टायर कंपनीमध्ये कामावर असून त्यांना प्रतीमाह रु.३०,०००/– पगार मिळत असल्याचे गैरअर्जदार क्र.२ ते ४ यांनी अर्जदार

क्र.१ च्या आई–वडीलांना सांगून लग्न केले होते. गैरअर्जदार क्र.२ हे स्वतः ई–रिक्शा चालवितात. गैरअर्जदार क्र.१ वर अर्जदारांव्यतिरिक्त कोणाचीही जबाबदारी नाही. करिता प्रस्तूतचा अर्ज.

६. गैरअर्जदारांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१० लगत दाखल केले व अर्जदारांनी गैरअर्जदारांविरुद्ध केलेले सर्व आरोप नाकारले. त्यांनी मान्य केले की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न दि.२६.०५.२०१७ रोजी झाले होते व लग्नानंतर ती संयुक्त कुटुंबात नांदण्यासाठी आली होती. लग्नाच्या वेळी गैरअर्जदार क्र.१ हे टायर मोटर्सच्या दुकानामध्ये काम करत होते व त्याला प्रतीमाह रु.१०,०००/– पगार मिळायचा. गैरअर्जदार क्र.१ ने लग्नानंतर दिड वर्ष तेथे काम केले, परंतू तेथे पगार बरोबर मिळत नसल्याने तेथील काम सोडले. त्यानंतर त्याने अष्टविनायक कंस्ट्रक्शन कंपनी हिंगणा येथे पर्यवेक्षक म्हणून एक ते दोन वर्ष काम केले. तेथे त्याला प्रतीमाह रु.१२,०००/– पगार मिळायचा. त्यांनी मान्य केले की, अर्जदार क्र.२ ही गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.१ यांची मुलगी आहे.

७. गैरअर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार क्र.१ हे त्याला मिळालेल्या पगारातून रु.२,०००/– स्वतःच्या खर्चाकरिता काढून उरलेला संपूर्ण पगार अर्जदार क्र.१ ला द्यायचे. त्या रु.२,०००/– मध्ये गैरअर्जदार क्र.१ आठवडी बाजार व कामाला येण्याजाण्याचा खर्च करायचे व पैशाची आवश्यकता पडली तर अर्जदार क्र.१ ला पैसे मागायचे, त्यावेळी अर्जदार क्र.१ तिच्याकडे पैसे नाही असे म्हणायची. तसेच अर्जदार क्र.१ गैरअर्जदार क्र.१ ला 'तुम्हाला कामावर जायचे असेल तर जा नाहीतर घरी बसा, पण मला पैसे मागू नका किंवा भीक मागा' असे म्हणायची, त्यामुळे त्यांच्यात भांडण व्हायचे. गैरअर्जदार क्र.३ ही सरकारी नोकरीवर असल्याने तिचे लग्नाआधी संपूर्ण घराचा सांभाळ ती करायची. त्यांनी मान्य केले की, गैरअर्जदार क्र.३ ने गैरअर्जदार क्र.२ ला ई–रिक्शा घेऊन दिली व गैरअर्जदार क्र.३ च्या लग्नानंतर

गैरअर्जदार क्र.२ हा घरामध्ये लागणारा सर्व खर्च करायचा. अर्जदार क्र.१ ही कुठल्या ना कुठल्या कारणावरून गैरअर्जदारांसोबत भांडायची. अर्जदार क्र.१ ही सतत छोट्या छोट्या कारणांवरुन भांडण करायची व आपल्या माहेरी फोन करून आपल्या आई–वडीलांना बोलवायची व सतत माहेरी निघून जायची व तीचे वडील तिची समजूत घालून तिला परत आणून द्यायचे. गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ ने दिलेला त्रास सहन करत त्यांचा संसार सुखाचा व्हावा म्हणून शांत राहून सगळं सहन करायचा.

८. गैरअर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.२ ला कॅन्डीसाठी लागणारे पैसे दिले नाही व जिद्द केली म्हणून मारहाण केली. त्यावर गैरअर्जदार क्र.१ ने का मारले असे विचारले असता अर्जदार क्र.१ त्याला उलटसुलट बोलली व स्वतःच ओट्यावरचा गंज घेऊन स्वतःच्या डोक्यावर मारला. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ चा कधीही कुठल्याही प्रकारचा अपमान व मारहाण केली नव्हती. अर्जदार क्र.१ ला गैरअर्जदार क्र.१ सोबत संसार करायचा नाही म्हणून तिने गैरअर्जदारांविरुद्ध खोटा खटला दाखल केला. गैरअर्जदार क्र.१ सध्या बेरोजगार आहे. गैरअर्जदार क्र.२ रिक्शा चालवित असतात म्हणून गैरअर्जदार क्र.१ हे गैरअर्जदार क्र.२ च्या पत्नीची म्हणजेच स्वतःच्या आईची मानसीक स्थीती बरोबर नसल्यामुळे तिची घरी राहून काळजी घेतात. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांविरुद्ध तक्रार दाखल करुन माहेरी जातेवेळी गैरअर्जदार क्र.१ च्या घरी परत आली होती. तेव्हा तीने रुममध्ये जाऊन एका थैली मध्ये सामान भरुन व अलमारीमधील दागीने असलेल्या लॉकरला व महत्वाच्या कागदपत्रांच्या लॉकरला लॉक लाऊन अलमारीची चावी स्वतःसोबत घेऊन माहेरी गेली. त्यामुळे दागीन्याबद्दल गैरअर्जदार क्र.१ ला काहीही माहिती नाही. गैरअर्जदार क्र.१ ही दि.०८.०१.२०२३ पासून तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार क्र.१ ही हल्दीराम फुड कंपनीमध्ये कामाला जाते व स्वतःचा सांभाळ करते. अर्जदारांनी गैरअर्जदारांना त्रास देण्याच्या

उद्देशाने खोटी केस केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खारीज करण्यात यावा.

९. खालील वाद मुद्दे माझ्या विचारार्थ असून त्याखालील दिलेल्या कारणांकरीता निष्कर्ष नोंदवीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे मागणीनुसार अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...अंशतः होय. |
| २ | अर्जदार हे मागणीप्रमाणे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| ३ | अर्जदार हे मागणीप्रमाणे निवासस्थान उपलब्ध करुन देण्यास व स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहेत काय ? | नाही. |
| ४ | अंतिम आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

१०. अर्जदारांच्या अर्जामधील कथनांवरुन प्रथमदर्शनी अर्जदारांच्या बाबतीत गैरअर्जदारांकडून कौटुंबीक हिंसाचाराचे कृत्य घडल्याचे दिसून येते. वर नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदारांनी जरी अर्जदारांनी त्यांच्यावर केलेले सर्व आरोप नाकारले असले तरी त्यांनी अर्जदारांसोबत त्यांचे संबंध असल्याचे मान्य केलेले आहे. सबब अर्जदार हे प्रथमदर्शनी गैरअर्जदार क्र.१ कडून अंतरिम आर्थिक साहाय्य मिळण्यास पात्र आहेत.

११. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा रक्कम रु.२०,०००/– अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. अर्जदारांच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ हा टायर कंपनीत काम करतो व दरमहा रु.३०,०००/– कमवितो, परंतु अर्जदारांनी गैरअर्जदार क्र.१ च्या उत्पन्नाबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. गैरअर्जदारांनी त्यांच्या जबाबामध्ये केवळ अर्जदारांनी गैरअर्जदारांवर केलेले आरोप नाकारले, तसेच तो टायर कंपनीत

काम करुन दरमहा रु.३०,०००/– कमवीत असल्याचे सुध्दा नाकारले. त्यांनी त्यांच्या जबाबामध्ये गैरअर्जदार क्र.१ हा सध्या बेरोजगार आहे असे कथन केलेले आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ ने त्याच्या मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.११ मध्ये सुध्दा त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे कथन केलेले आहे, परंतु त्याने त्याच्या बँकेचा खाते उतारा अभिलेखावर दाखल केलेला नाही. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदार क्र.१ हा तो करीत असलेले काम व त्यातून मिळणारे उत्पन्न न्यायालयापासून लपवू इच्छीतो.

१२. अर्जदार क्र.१ ने तिचे मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.२३ कडे दाखल केलेले आहे. त्यामध्ये तिने नमूद केले आहे की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच तिला न्यायालयाकडून पोटगी मंजूर झालेली नाही. गैरअर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ ही हल्दीराम फुड कंपनीमध्ये कामाला जाते, परंतु गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ कोठे काम करते व किती उत्पन्न मिळवते याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदारांनी त्यांच्या जबाबामध्ये गैरअर्जदार क्र.१ हा सध्या बेरोजगार आहे असे कथन केलेले आहे, परंतु सदर कथन पटण्याजोगे नाही. गैरअर्जदार क्र.१ हा सुदृढ व्यक्ती असून अर्जदारांचा सांभाळ करणे हे त्याचे कायदेशीर तसेच नैतीक कर्तव्य आहे. अभिलेखावर गैरअर्जदार क्र.१ याच्या उत्पन्नाचा पुरावा नसल्यामुळे मी गैरअर्जदार क्र.१ चे अंदाजे उत्पन्न गृहीत धरत आहे. आजच्या घडीला एक मजूर दररोज रु.४००/– ते रु.५००/– कमवितो, म्हणजेच महिन्याला रु.१२,०००/– ते रु.१५,०००/– कमवितो. त्यामुळे मी गैरअर्जदार क्र.१ चे अंदाजे उत्पन्न रु.१५,०००/– प्रतीमाह गृहीत धरत आहे. गैरअर्जदार क्र.१ ने त्याचे मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.११ मध्ये त्याच्यावर अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणी अवलंबून आहे असे कथन केलेले नाही. अशा परिस्थीतीत अर्जदारांच्या पालनपोषणाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ही पत्नी म्हणून व

अर्जदार क्र.२ ही मुलगी म्हणून गैरअर्जदार क्र.१ कडून खावटी मिळण्यास पात्र आहेत.

१३. अर्जदार हे सध्या अर्जदार क्र.१ च्या आई वडीलांकडे राहत आहे व आपल्या उदरनिर्वाहासाठी संपूर्णपणे अर्जदार क्र.१ च्या आईवडीलांवर अवलंबून आहे. अशा परिस्थीतीत सद्यस्थितीच्या महागाईच्या दराचा, अर्जदार क्र.१ ला लागणा–या दैनंदीन खर्चाचा, अर्जदार क्र.२ हिला शिक्षणासाठी व औषधोपचारासाठी लागणा–या खर्चाचा विचार करता अर्जदार क्र.१ ला दरमहा रक्कम रु.५,०००/– व अर्जदार क्र.२ ला ती वयात येईपर्यंत (till attaining majority) दरमहा रु.४,०००/– अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी मंजूर करणे न्यायोचीत राहील. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत :–</u>**

१४. प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदारांनी संरक्षण आदेश पारीत करण्याची विनंती केलेली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम दर्शनी गैरअर्जदारांनी अर्जदारांवर कौटुंबीक हिंसाचार केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार हे गैरअर्जदारांविरुद्ध संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहेत. करिता मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत :–</u>**

१५. अर्जदारांनी त्यांना निवासस्थान उपलब्ध करुन द्यावे व स्त्रीधन परत करण्याचा आदेश पारीत करावा अशी विनंती केलेली आहे, परंतू अर्जदारांचे असे म्हणणे नाही की ते सध्या भाड्याच्या घरात राहतात. अर्जदार हे सध्या अर्जदार क्र.१ च्या आई–वडीलांकडे राहत आहेत ही बाब निर्विवाद आहे. त्यामुळे अर्जदारांना वेगळे निवासस्थान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अर्जदारांनी जरी स्त्रीधन परत मिळण्याची विनंती केली असली तरी गैरअर्जदारांनी त्यांच्या जबाबामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांविरुद्ध तक्रार दाखल करुन माहेरी जाते वेळी घरी परत आली होती व तेव्हा तीने रुममध्ये जाऊन एका थैली

मध्ये सामान भरुन व अलमारी मधील दागीने असलेल्या लॉकरला व महत्वाच्या कागदपत्रांच्या लॉकरला लॉक करुन अलमारीची चावी स्वतःसोबत माहेरी नेली होती. अर्जदार क्र.१ चे दागीने व इतर स्त्रीधन गैरअर्जदारांच्या ताब्यात आहे किंवा नाही ही बाब अर्जदारांना पुराव्या दरम्यान शाबीत करावी लागेल. त्यामुळे याक्षणी गैरअर्जदारांविरुध्द स्त्रीधन परत करण्याचा आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही. करिता मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज (नि.क्र.१६) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिला दरमहा रक्कम रु.५,०००/– व अर्जदार क्र.२ ला ती वयात येईपर्यंत (till attaining majority) दरमहा रु.४,०००/– अंतरिम पोटगी म्हणून सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि.२८.१२.२०२३ पासून ते मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत दयावे.

३. गैरअर्जदार क्र.१ व २ यांना आदेशीत करण्यात येते की, सदर अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत त्यांनी अर्जदारांविरुध्द कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करू नये व त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास देवू नये.

४. अर्जदारांची निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची व स्त्रीधन परत देण्याची मागणी फेटाळण्यात येत आहे.

५. या निर्णयाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2025.01.24 17:10:33 +0530

(रा. र. शेरेकर)

दिनांक –२४/०१/२०२५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), कामठी.

ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 24.01.2025 |
| Order dictated on | : | 24.01.2025 |
| Transcription ready on | : | 24.01.2025 |
| Order checked and signed on | : | 24.01.2025 |

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word to word as per original order.

**Name of Steno :- Vrushabh Wanjari**